राजू साळवी



रत्नागिरी तालुक्यातील गोळप परिसरातील महिलांसाठी आयोजित कर्करोग निदान आपल्या दारी या उपक्रमाचे उद्घाटन डॉ. सुनीता चव्हाण यांच्या हस्ते झाले.

# कर्करोगाबाबत महिलांमध्ये जागृती व्हावी : कोपीकर

**रत्नागिरी :** कर्करोग प्राथमिक अवस्थेत असताना त्याचा सामना करण्यासाठी महिलावर्गाने सजग व्हावे, अन्य महिलांमध्ये जागृती करावी, असे आवाहन जागतिक पातळीवर कॅन्सरवर काम करणारे तज्ज्ञ डॉ. चैतन्य कोपीकर यांनी केले आहे.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाऊंडेशन, पुण्याचे प्रशांती कॅन्सर केअर मिशन यांच्यावतीने रत्नागिरीत कर्करोग निदान आपल्या दारी हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. १७ ते २० डिसेंबर या कालावधीत गोळप व परिसरातील महिलांसाठी आयोजित या कार्यक्रमाचे करण्यात आले. यावेळी डॉ. रमेश चव्हाण, रितू छाब्रिया उपस्थित होते. प्रशांती कॅन्सर केअर मिशनच्या संचालिका लालेह गुशेरी, तज्ज्ञ डॉक्टर, समुपदेशक आणि अद्ययावत तपासणीची उपकरणे असलेली व्हॅन घेवून या शिबिरासाठी आले आहेत. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत गोळप येथील फिनोलेक्स कॉलनीमध्ये तसेच पंचक्रोशीतील गावामध्ये जावून ही तपासणी केली जाणार आहे.

यावेळी रक्षंदा अन्सारी, डॉ. ज्योती चव्हाण, संचालक एस. एस. मठ, ए. बी. अत्रे, तातुगडे, डॉ. आशुतोष मुळे, टी. के. काकडे, सागर चिवटे, गौरी